# महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन,६वा मजला
नवी मुंबई:-४०० ६१४
दिनांक :- 8 DEC 2005

## कार्यालयीन आदेश क्रमांक ६१ दिनांक

विषय:- लेखापरीक्षण अहवाल वर्षनिहाय निर्गमित करणेबाबत.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण विहीत वेळापत्रकानुसार पूर्ण करून विहीत मुदतीत लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी निर्गमित होणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव लेखापरीक्षण प्रलंबित राहिल्यास संबंधित संस्थेच्या पुढील वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी प्रलंबित घटकांचे लेखापरीक्षण पूर्ण करून अहवाल निर्गमित केला जातो.

नगरपालिका लेखापरीक्षण अहवालाचा आढावा घेतला असता, असे निदर्शनास आले आहे की, ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात (२ ते १० वर्षे) घटक प्रलंबित असतात अशावेळी एकत्रित लेखापरीक्षण करून सर्व लेखापरीक्षण आक्षेपाचा एकत्रितपणे एकच लेखापरीक्षण अहवाल निर्गमित केला जातो. या विषयी असे सुचित करण्यात येते की, प्रलंबित घटकांचे लेखापरीक्षण एकत्रित करण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. मात्र लेखापरीक्षण अहवाल हा संबंधित संस्थेचा वार्षिक अहवाल असल्याने तो वर्षनिहाय निर्गमित होणे आवश्यक आहे. सर्व थकित घटकांचा एकत्रित अहवाल तयार केल्यामुळे वर्षनिहाय परिच्छेद संख्या, वर्षनिहाय भार-अधिभार प्रस्ताव इत्यादी माहिती अचुकरित्या उपलब्ध होत नाही. भविष्यात नगरपालिकांचे लेखे द्विनोंद लेखापध्दतीनुसार ठेवल्यास वरीलप्रमाणे एकच लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे संयुक्तीक ठरणार नाही.

यापुढे लेखापरीक्षण अहवाल वर्षनिहाय तयार करून निर्गमित करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. प्रलंबित घटकांचे एकापेक्षा जास्त वर्षांचे लेखापरीक्षण एकाच वर्षी करण्यात आलेले असले तरीही लेखापरीक्षण अहवाल मात्र एकत्रित न करता वर्षनिहाय निर्गमित करावे याची नोंद घेण्यात यावी.

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

१. उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा ------------------
२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा ------------------
३. निवडनस्ती.

वि. AA-3 com-3 ६१२०५